# MAHARASHTRA ACT No. XIV OF 1981

## THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) (EXTENSION OF DURATION) ACT, 1981

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २४ मार्च १९८१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोंडे,
सचिव,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XIV OF 1981

## AN ACT TO EXTEND THE DURATON OF THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) ACT, 1980.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २५ मार्च, १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

### महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याची मुदत वाढविण्यासाठी अधिनियम.

१९८० चा महा. १६. ज्याअर्थी, महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याची मुदत वाढविणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (मुदत वाढविणे) अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम १६ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवाटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाडयाची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याच्या कलम १, पोट-कलम (३) मधील " ३१ मार्च १९८१ " या मजकुराऐवजी " ३१ मार्च १९८२ " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९८० चा महा. १६.

(यथार्थ अनुवाद)
न. व. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.